# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/AZ/AUR/R/169/2009/03/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Panjabrao Rangrao Awachar, **House No.79/413, Dnyanchand Nagar, Chitegaon, Tq.Paithan Dist.Aurangabad.** (Con. No.49480043923)

Dear Sir

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from. Shri Panjabrao Rangrao Awachar, House No.79/413, Dnyanchand Nagar, Chitegaon, Tq.Paithan Dist.Aurangabad.**

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excesss/average bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **14.01.2009 at 12.30 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl:As above

Copy to:-
Shri Panjabrao Rangrao Awachar,
House No.79/413, Dnyanchand Nagar,
Chitegaon, Tq.Paithan Dist.Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/१६९/२००९/०३**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०६/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- २४/०२/२००९**

**श्री पंजाबराव रंगराव आवचर,**
**ज्ञानचंद नगर चितेगांव,**
**ता. पैठण जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९४८००४३९२३२) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/०१/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन चितेगांव येथे घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. महावितरण कंपनीने त्यांना मीटर वरील रिडींगप्रमाणे बिल न आकारता सतत सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी केली असल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. सप्टेंबर २००८ मध्ये त्यांना ९८१६०/- रूपयाचे बिल आकारण्यात आले व या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याची धमकी त्यांना महावितरण कंपनीतर्फे देण्यात येत असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे. या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेण्यात आल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन त्यांना व्याज व दंड न लावता सुधारीत वीज बिल देण्याची आदेश महावितरण कंपनीला देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १४/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री समद सरदार उपस्थित होते. महावितरण कंपनीचे नोडल अधिकारी उपस्थित नव्हते. मंचाने महावितरण तर्फे अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलाची पाहणी केल्यानंतर त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आल्याचे दिसुन आले. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यत त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये असा अंतरीम आदेश पारीत करीत मंचाने या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक २०/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक २०/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री समद सरदार तसेच नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री आर.पी. चव्हाण, सहाय्यक अभियंता पैठण,उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदारास सरासरीवर आधारीत बिल देण्यात आल्याचे मान्य करून सुधारीत वीज बिल  देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. मंचाने  दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर नोडल अधिकारी प्रतिनिधी यांना मीटर बदली अहवाल, स्थळ पाहणी अहवाल, सी.पी.एल. तसेच सुधारीत वीज बिल प्रस्ताव दाखल करण्याचे सांगत पुढील सुनावणी २७/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक २७/०१/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी श्री समद सरदार उपस्थित होते. नोडल अधिकारी प्रतिनिधी यांनी सुधारीत प्रस्ताव दाखल करण्यासाठी मुदतवाढ मागीतली.मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ३१/०१/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक ३१/०१/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी श्री ए.आर.पाटील तसेच सहाय्यक अभियंता श्री आर.पी.चव्हाण उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे मीटर २०/०६/२००७ रोजी बदलण्यात आल्यानंतर त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले.दिनांक १७/०१/२००९ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात नविन मीटर वरील रिडिंग ही २१८९५ अशी  आढळुन आल्यामुळे त्यांना त्याप्रमाणे वीज बिल देण्यात आले. तसेच अर्जदार हे वाणीज्य वापरासाठी ही वीज वापरत असल्याचे सुनावणी दरम्यान  सांगितले. अर्जदाराने ऑगस्ट २००८ नंतर दुकान भाड्याने दिल्याचे सांगत त्यांना देण्यात आलेल्या घरगुती वीज पुरवठ्यातुन दुकानात वीज दिली असल्याचे मान्य केले.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर नोडल अधिकारी यांना सुधारीत वीज बिल प्रस्ताव मंचात दाखल करण्याचे सांगितले पुढील सुनावणी दिनांक ०७/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

६) दिनांक ०७/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री समद सरदार उपस्थित होते. नोडल अधिकारी श्री ए.आर. पाटील यांनी ऑगस्ट २००८ पर्यत तयार केलेला वीज बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला.अर्जदाराने त्याला देण्यात आलेल्या वीजेचा वापर घरगुती व वाणीज्य वापरासाठी केलेला असल्याचे मान्य केल्यामुळे मंचाने नोडल अधिकारी यांना वीज भार तपासुन त्याप्रमाणे सुधारीत वीज बिल प्रस्ताव १०/०२/२००९ पर्यंत दाखल करण्याचे आदेश देत प्रकरण निकासाठी ठेवले.

७) अर्जदार व महावितरण कंपनी तर्फे दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरून तसेच मंचासमोर झालेल्या सुनावणीवरून असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी ०९/१०/२००२ साली वीज पुरवठा घेतला आहे. महावितरण कंपनीकडुन त्यांना डिसेबर २००६ पर्यत अनेक वेळा सरासरीवर आधारीत वीज वापराचे बिल आकारण्यात येत होते.अर्जदाराचे सी.पी.एल. चे निरिक्षण केल्यावर डिसेबर २००६ मध्ये अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलात मागिल रिडिंग १४७७ व चालु रिडिंग ३०९५ असे दर्शवित ८ महिन्याच्या कालावधीचे १६१८ युनिट वीज वापराचे बिल देण्यात आल्याचे दिसुन अर्जदाराचे मीटर २०/०६/२००७रोजी बदलण्यात आले पण या मीटर बदली अहवालाची नोंद न घेण्यात आल्यामुळे अर्जदारास जानेवारी २००७ ते जुन २००८ या काळात सरासरीवर आधारीत २०२ युनिट वापराचे वीज बिल आकारण्यात आले.दिनांक २०/०६/२००७ रोजी लावण्यात आलेल्या नविन मीटरची नोंद (मीटर क्रमांक २०३४१६७)जुलै २००८ मध्ये पहिल्यांदा घेण्यात आली असल्याचे दिसुन येते.महावितरण कंपनीने अर्जदारास ऑगस्ट २००८ मध्ये मागिल रिडींग ००००२ व चालु रिडिंग १९०५५ अशी दर्शवित १९०५३ युनिट वापराचे वीज बिल आकारले असल्याचे दिसुन येते. दिनांक १७/०१/२००९ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात या मीटरवरील रिडिंग ची नोंद २१८९६ अशी असल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ०९/१०/२००२ रोजी वीज

पुरवठा करण्यात आल्यानंतर त्यावेळी  लावण्यात आलेले मीटर (मीटर क्रमांक १२८०३४८) हे नोव्हेंबर २००३ नंतर बंद असल्याचे मीटर बदली अहवालावरून दिसुन येते. त्यामुळे नोव्हेंबर २००३ ते नविन मीटर बसविण्यात आलेल्या तारखेपर्यंत म्हणजेच २०/०६/२००७ पर्यंत महावितरण तर्फे अर्जदारास चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसुन येते.अर्जदारास वीज पुरवठा केलेल्या तारखेनंतर (०९/१०/२००२ ते नोव्हेबर २००३ या काळातील वीजेचा वापर  मीटर वरील रिडिंग प्रमाणे नोंदविण्यात आलेला नसल्यामुळे अर्जदारास मागिल सहा महिन्याच्या सरासरी  वीज वापराच्या आधारावर वीज आकारणी करणे शक्य नाही त्यामुळे अर्जदाराने प्रत्यक्ष जोडलेला वीज भार लक्षात घेवुन व अर्जदाराने त्यास मान्यता दिलेली असल्यामुळे याकाळातील वीज आकारणी प्रत्यक्ष जोडलेल्याीज भारानुसार करणे योग्य ठरेल असे मंचाचे मत आहे.अर्जदाराने जोडलेला प्रत्यक्ष वीज भार ४५० वॅट असा असल्यामुळे त्यास १४ युनिट प्रतिमहिना प्रमाणे वीज बिल आकारणी करण्याचा महावितरणचे नोडल अधिकारी यांनी दाखल केलेला प्रस्ताव मंच मान्य करीत आहे. दिनांक २०/०६/२००७ रोजी लावण्यात आलेल्या  नविन मीटरची सुरूवातीची रिडिंग ही ००००२ अशी असुन दिनांक १७/०१/२००९ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात ती २१८९६ अशी असल्याचे दिसुन येते. यावरून २०/०६/२००७ ते १७/०१/२००९ याकाळात अर्जदाराचा एकुण वीज वापर २१८९४ युनिट असल्याचे स्पष्ट होते. सुनावणी दरम्यान ऑगष्ट २००८ पासून दुकानासाठी म्हणजेच वाणिज्य वापरासाठी याच मीटरवरून वीज वापर केलेला असल्याचे अर्जदाराने मान्य केले आहे.महावितरण कंपनीतर्फे देखील याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे नोडल अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मंचास सांगितले. मंचाने अर्जदारास वाणिज्य वापरासाठी वेगळा अर्ज दाखल करून वीज जोडणी त्वरीत करून घेण्याबाबत आदेश दिले.दिनांक  २०/०६/२००७ ते १७/०१/२००९ याकाळात अर्जदाराचा एकुण  २१८९४ युनिट वीज वापर असुन त्यात  घरगुती व वाणिज्य वापरासाठी केलेला वीज वापराचा समावेश आहे. नोडल अधिकारी यांनी सप्टेंबर २००८ ते डिंसेबर २००८ याळात अर्जदारास त्यांचे घरगुती वापराचे युनिट वजा करून उर्वरीत युनिट वाणिज्य वापरासाठी गृहीत धरून वीज बिल रिव्हीजनचा प्रस्ताव मंचात दाखल केला आहे जो योग्य असल्याचे मंचाचे मंत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास नोव्हेबर २००३ ते २०/०६/२००७ याकाळात १४ युनिट प्रतिमहा याप्रमाणे वीज बिल आकारणी करावी.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास २१/०६/२००७ ते ऑगस्ट २००८ याकाळात (१९०५५-००००२) १९०५३ वीज वापराचे बिल विभागुन द्यावे.

३) वरील १ ते २ प्रमाणे वीज बिल दुरूस्ती करून महावितरण कंपनीने अर्जदारास सुधारीत वीज बिल तीस दिवसात द्यावे.

४) वरीलप्रमाणे अर्जदारास देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

५) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास चुकीच्या वीज बिलाची आकारणी केल्याचे दिसुन आल्यामुळे अर्जदारास चार हप्त्यात सुधारीत वीज बिल भरण्याची मान्यता देण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

२००९/०३

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६९/२००९/०३** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री पंजाबराव रंगराव आवचर,**
**ज्ञानचंद नगर चितेगांव,**
**ता. पैठण जिल्हा औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६९/२००९/०३ )

आपण दिनांक ०६/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**